**२) शरीर संगोपन :** या कालावधीत जनावरांना समतोल ऊर्जा व प्रथिने पुरवण्याची गरज असते, कारण गर्भधारणा होणार असते, त्याचबरोबर शरीरात प्रौढपणाची लक्षणे वाढत असतात. म्हणजेच कासेच्या पेशी मोठ्या संख्येने आणि आकाराने वाढत असतात, हाडांमध्ये प्रचंड बळकटी वाढत असते. चरबीचे साठे शरीरात तयार होत असतात. एकंदरीत हे मुख्य बदल हळूहळू होत असतात. यांची विशिष्ट गरज पोषकांमार्फत पूर्ण करणे गरजेचे असते. नेमके हेच उद्दीष्ट समोर ठेऊन हिंदुस्तान फीड्सने **'गोवत्स हीफर'** या पशुखाद्याची निर्मिती केली आहे.

**३) दुग्ध उत्पादनासाठीची तयारी :** उच्चतम दुग्ध उत्पादन असणाऱ्या जनावरांच्या दुग्धोत्पादनची तयारी म्हणजेच, त्यांच्या शरीराच्या सापळ्याचे वजन व शरीरामध्ये मर्यादित चरबीचे साठे होय.

**'गोवत्स हीफर' पशुखाद्य देण्याचे प्रमाण (कि.ग्रॅ. मध्ये)**

| वय (महिन्यामध्ये) | खाद्य देण्याचे प्रमाण (कि.ग्रॅ.मध्ये) |
|---|---|
| १३ ते १७ | २ |
| १८ ते २० | २.५ |
| २० ते २३ विण्यापुर्वी एक महिन्यापर्यंत | ३ |

'गोवत्स हीफर' हे खाद्य वयाच्या बाराव्या महिन्यानंतर वासराला वरील मात्रेमध्ये द्यावे. विण्यापुर्वी एक महिन्यापासून हिन्दुस्तान फीड्सचे परिवर्तन काळासाठीचे **'वात्सल्य'** (Transition Feed) हे पशुखाद्य वापरावे.

**पॅकिंग :**
**'गोवत्स स्टार्टर, गोवर, हीफर'** ही पशुखाद्ये गोळीच्या (Pellet) स्वरूपात उपलब्ध आहे. "**गोवत्स स्टार्टर**" हे खाद्य २५ व ५० कि.ग्रॅ. तसेच "**गोवत्स ग्रोवर व हीफर**" हे खाद्य फक्त ५० कि. ग्रॅ. च्या आकर्षक लॅमिनेटेड प्लॅस्टिक बॅग मध्ये उपलब्ध आहे. आपणास नजिकच्या हिन्दुस्तान फीड्सच्या पशुखाद्य विक्रेत्याकडे मागणी केल्यास उपलब्ध होईल.

**साठवणूकी संबंधी सुचना :**
**गोवत्सच्या** सर्व पशुखाद्याची साठवणूक ही थेट सुर्यप्रकाशपासून दूर, थंड, बंद व कोरड्या जागेत करावी, जाणेकरून साठवलेल्या ठिकाणी आर्द्रता व तापमान कमीत कमी राहून पशूखाद्याची साठवणूक चांगली होईल. पशुखाद्यास कोणत्याही प्रकारे ओलावा लागणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे, यामुळे पशुखाद्याचे बुरशीपासून संरक्षण होते.

**महत्त्वाची सुचना :**
**गोवत्सची** सर्व पशुखाद्ये वेळोवेळी आवश्यक त्या प्रमाणात खरेदी करावीत. त्यामुळे त्यामधील पोषणमुल्यांचा ऱ्हास होत नाही. गोवत्सचे कोणतेही खाद्य हे तीन आठवड्याच्या आतील वासरांना देऊ नये. गोवत्स पशुआहारांचा वापर मनुष्यप्राणी, घोडा, कुत्रा, मांजर व इतर दुसऱ्या प्राण्यांसाठी करू नये. तसेच मनुष्यांना देखील हे खाद्य हानीकारक आहे.

**वासरांचे / कालवडींचे सर्वसामान्य व्यवस्थापन :**

१. जन्माला आल्याबरोबर वासराच्या नाका तोंडातील चिकट पदार्थ दूर करावा.

२. त्याची नाळ शरिरापासून दोन ते पाच सें.मी. कापून शरिरालगत एक सें.मी. वरती दोऱ्याने बांधावी व तेथे आयोडीनसारखे जंतूनाशक औषध लावावे

३. गाईला येणारे पहिले दूध चिक (Colostrums) पाजावे. वासराचे सर्वात महत्वाचे हे पहिले अन्न आहे. जन्मानंतरचे पहिले तीन ते सात दिवस हे पोषणसत्व युक्तचिक वासराच्या वजनाच्या १०% इतके त्याला मिळणे आवश्यक आहे. नंतर त्याच मात्रेमध्ये कमीतकमी पहिले आठ आठवडे वासराला गाईचे दूध मिळणे आवश्यक आहे. तद्नंतरचा एक महिना वासराच्या वजनाच्या ८% दूध मिळणे आवश्यक आहे. चौथ्या महिन्यात दररोज वासराच्या वजनाच्या ५% एवढे दूध देऊन ५ व्या महिन्यापासून वासराला दुधातून तोडता येते.

४. वासरांची वाढ म्हणजे स्नायुंची व हाडांची वाढ त्यामुळे जसे वाढत जाईल तशी त्यांची पाण्याची गरज वाढत जाते. वासराना पहिल्या आठवड्यानंतर मुबलक पाणी मिळणे आवश्यक आहे कारण वासराची तहान मर्यादीत मिळणाऱ्या दुधाने भागत नसते. एक महिन्यानंतर दुधाची मात्रा कमी केल्यानंतर त्यांच्यासमोर नियमितपणे खालीलप्रमाणे स्वच्छ पाणी उपलब्ध करावे.

**वासराच्या वयानुसार पाणी देण्याचे दैनंदिन प्रमाण :**

| वय (महिन्यामध्ये) | पाण्याचे प्रमाण (लिटर/प्रतिदिन) |
|---|---|
| १ | ५ ते ७.५ |
| २ | ५.५ ते ९ |
| ३ | ८ ते १०.५ |
| ४ | ११.५ ते १३.५ |
| ५ | क्षमतेनुसार पाणी वाढ करणे |

५. जन्मताच वासराच्या पोटाची संरचना मानवाच्या पोटाच्या संरचनेसारखे पचनकार्य करत असल्याने वासराच्या साध्या पोटाचे रवंथ करणाऱ्या प्राणी प्रकारच्या कोठीपोटात रूपांतर आणि स्थित्यंतर होईपर्यंत त्याचे पोषण व वाढ दुधावर होते. दुधाची आहारातील दैनिक मात्रा कमी करून पशुखाद्य व इतर चाऱ्यावर वासराचे संगोपन पुढे चालू ठेवण्यासाठी व कोठीपोटाचा विकास होण्यासाठी चेतना मिळावी म्हणून त्यांना दोन आठवडे वयानंतर त्यांच्या आहारात वाळलेले गवत व पालेसूद कडबा देणे उपयोगी ठरते. याप्रमाणे हळूहळू गवत खाण्याचे प्रमाण वासराचे वय वाढेल तसे वाढून ते दीड ते दोन किलो पर्यंतचे गवत व कडबा वयाच्या सहा महिन्यापर्यंत खाऊ शकते. हिरव्या रंगाच्या वाळलेल्या गवतापासून जनावराला 'अ' व 'ब' समूहातील जीवनसत्वे मिळतात. वासराच्या वयाच्या तीन ते चार महिन्यानंतर पालेसूद मऊ असा हिरवा चारा देणे आवश्यक आहे.

६. वासरू गाईच्या अंगावरून दुधातून सोडविले जाईल त्यावेळी त्याला स्वतंत्र जागेत ठेवावे. ती जागा स्वच्छ, कोरडी, खेळत्या हवेची आणि गोचिड विरहीत असावी. गाईच्या अंगावर दुध पिण्याची सवय बंद झाली तरी अशा प्रकारची पिण्याची भावना वासरात काही दिवस पुढे राहते. त्यामुळे समुहात ठेवलेली वासरे एकमेकांना चाटून त्यांच्यामध्ये सांसर्गिक रोगाचा प्रसार वाढतो. त्यांना स्वतंत्र जागेत ठेवण्याची व्यवस्था केल्यास अशा प्रकारची व्याधी कमी होते. वासराच्या गोठ्याची पूर्वेकडची बाजू मोकळी ठेवल्याने वासरांना सकाळचे ऊन मिळेल. वासरांना भुशाची किंवा गवताची गादी गोठ्यात पुरवावी.

**वासराची वाढ योग्य होण्यासाठी त्यांना सुरक्षित निवारा खालील प्रमाणे पुरविणे आवश्यक आहे.**

| वयोगट | गोठ्यातील जागा (चौ.मी.) | |
|---|---|---|
| | वासरांसाठी उभे राहण्यासाठी क्षेत्र | व्यायामासाठी मोकळी जागा |
| ४-६ महिने | १ मीटर | ३-४ |
| ६-१२ महिने | १.५ मीटर | ५-६ |
| १२-१८ महिने | १.७५ मीटर | ६-८ |

७. जन्मताच वासरांची रोगप्रतिबंधक शक्ती कमी असते. त्याचे शरिरात रोगप्रतिबंधक शक्ती निर्माण कार्य स्वतंत्र सुरू होईपर्यंत चिकामधून मिळणारी गाईकडील रोगप्रतिबंधक शक्ती त्याला उपयोगी पडते. पुढे इतर वासरांमधील वावराने शरीरात नैसर्गिकरित्या व विशिष्ट प्रकारच्या लसीकरणाने त्याच्या शरिरात रोग प्रतिकारक शक्ती निर्माण करून सामान्य रोगांपासून त्याचा बचाव करावा लागतो. गाई म्हैशींमध्ये होणाऱ्या गंभीर रोगांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य वेळी लसीकरण केले नाही तर अशा रोगांची वासरांमध्ये लागण होऊन ते बळी पडण्याची संभावना असते. कितीही काळजी घेतली तरी आजूबाजूची आर्द्रता, ओलावा, वातावरणाचे तापमान, जनावरांची वाढती ये-जा, माणसांचा वावर व जंताचा वाढता प्रादुर्भाव यामुळे वासरांना जंत होतातच. म्हणून वासरांना होणाऱ्या संसर्गजन्य रोगाचे निर्मुलन तज्ञांच्या मार्गर्दानाखाली करावे.

गोपालकांनो लक्षात ठेवा की जातीवंत दुधाळ जनावरे घरीच संगोपन करून निर्माण करावी लागतात. आजची जन्मलेली वासरे ही उद्याच्या दुधाळ गाई असून दुग्धशाळेचे ते आधार स्तंभ आहेत. **हिन्दुस्तान फीड्स च्या 'गोवत्स' पशुखाद्य मालिकेतील 'स्टार्टर, ग्रोवर, हीफर'** ही पोषक खाद्ये वासरांच्या / कालवडींच्या वयानुसार वापरून आपला नफा वाढवा.

अधिक माहितीसाठी हिन्दुस्तान फीड्सचे
**'समृद्ध गोसंवर्धन व दुग्ध व्यवसाय'** हे पुस्तक वाचावे.

पशुखाद्य
निर्मितीमध्ये नं. 1




**हिन्दुस्तान फीड्सच्या पशुखाद्यांची किमया न्यारी !**
**गोवत्सची स्टार्टर, ग्रोवर, हीफर पशुखाद्ये लय भारी !**


*बांधिलकी गुणवत्तेशी*

**हिन्दुस्तान फीड्स**

**सातारा युनिट :**
एल-४, अॅडिशनल एम.आय.डी.सी., सातारा - ४१५००४.
फोन : ०२१६२-२४०४७१/२/५
ग्राहक सेवा क्रमांक : ०२१६२-२४०७७३
मोबाईल : ९०११०१२७६२
ईमेल : marketing.str@hindustanfeeds.com

**बारामती युनिट :**
ई-२४८, एम.आय.डी.सी., बारामती, पुणे - ४१३१३३
फोन : ०२११२-२४३८३४, २४३६३४, २४३६८२
ईमेल : marketing.bmt@hindustanfeeds.com

**श्रीरामपूर युनिट :**
ई-५, एम.आय.डी.सी., श्रीरामपूर, अहमदनगर - ४१३७०९
मोबाईल : ९९२२५३३३५७, ७४४७७९५७४७
ईमेल : marketing.srm@hindustanfeeds.com


*बांधिलकी गुणवत्तेशी*

**हिन्दुस्तान फीड्स**

# 'गोवत्स'
## वासरांसाठी पशुआहार



*बांधिलकी गुणवत्तेशी*

**हिन्दुस्तान फीड्सच्या पशुखाद्यांची किमया न्यारी !**
**गोवत्सची स्टार्टर, ग्रोवर, हीफर पशुखाद्ये लय भारी !**

उच्च दुग्धोत्पादन असणारे गायी आणि म्हैशी पाळण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. अनुवंशिकता सुधारण्याचा वेग वाढत चालला आहे. चांगल्या वळूचे वीर्य कृत्रिम रेतनासाठी खेडोपाडीसुद्धा उपलब्ध झाले आहे. संकरीत गायी म्हैशी गोठ्यांमध्ये उच्च प्रमाणात दूध उत्पादन करत आहेत. परंतु अशी जनावरे बाजारातून खरेदी करणे थोडे महागाईचे झाले आहे. त्याचबरोबर ते जोखमीचे देखील झाले आहे. कारण बाजारातून फसवणूक होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून शेतकऱ्यांनी अशा जनावरांच्या वासरांचे योग्य संगोपन गोठ्यावर करणे गरजेचे आहे. बाजारात मिळणाऱ्या जनावरांपेक्षा गोठ्यावर संगोपन करून तयार केलेल्या गायी-म्हैशींच्या खर्चात बचत होते. तसेच अशी जनावरे आपल्या वातावरणास/आहारास सरावलेली असल्याने त्यांच्याकडून अधिक दूध उत्पादन मिळते व शेतकऱ्यांचे अर्थार्जन सुधारते.

गाईच्या चांगल्या कालवडी किंवा म्हैशीच्या रेड्या यांचे भविष्यातील उच्च दूध उत्पादनाचे लक्षण म्हणजे त्यांची वर्तमानातील होणारी वाढ होय. सर्वांगीण शारीरिक विकास चांगला होण्यासाठी आहार हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. परंतु त्याचबरोबर वेळोवेळी त्यांच्या गोठ्यामधील सहजतेसाठी सुविधा उपलब्ध करणे हे देखील महत्वाचे आहे, त्याचबरोबर जंतू व गोचिडांचा प्रादुर्भाव न होऊ देणे, वेळोवेळी लसीकरण करणे, गोठ्यामध्ये मलमूत्र वेळच्यावेळी साफ करणे, दुर्गंध विरहीत वातावरण उपलब्ध करून देणे, त्याचबरोबर जनावरे स्वच्छ राहतील याची काळजी घेणे, जी जनावरे आजार किंवा इतर रोगाच्या प्रादुर्भावात असतील अशांना इतर जनावरांपासून दूर बांधणे याची देखील काळजी घेणे गरजेचे आहे.

आजची शास्त्रीय पद्धतीने संगोपन केलेली कालवड / वासरू ही उद्याची दुधाळ गाय/म्हैस आहे. याकरिता वासरांचा विचार करून वासरांचे संगोपन योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. आपल्याकडील प्रचलीत रूढीनुसार साधारण सहा महिने वयापर्यंत वासरे गाईचे दुध पीत असतात. गाईचे दुध लहान वासरांना सर्वोत्तम पोषक अन्न आहे आणि ते त्यांना यथेच्छ मिळणे आवश्यक आहे, जेणेकरून मौलिक सत्वांचा पुरवठा झाल्याने त्यांची शरीर वाढ अनुवंशीकतेप्रमाणे व संगोपन झपाट्याने होते. संकरीत कालवडींचे लवकर वयात येणे व गाभण जाऊन उत्पादनात येणे हे त्यांच्या शारिरीक वाढीवर अवलंबून असते. उत्पादकास दुध विक्रीने नियमितपणे हातात पैसा खेळत राहतो. त्याच बरोबर वयात न आलेल्या वासराकडून थेट उत्पन्न मिळत नाही. यामुळे वासराला कमीतकमी दुध देऊन अधिकाधिक दुध विक्री करण्याकडे उत्पादकाचा कल असतो. वासराची वाढ त्यांच्या आहारावर अवलंबून असते. यासाठी वासरांना पुरेसा आणि चांगला आहार देणे महत्वाचे असते. वासरू संगोपनामध्ये कमी दुध मिळाल्याने पोषणसत्वांची उणीव राहते. ही उणीव भरून काढण्याच्या दृष्टीने **हिंन्दुस्तान फीड्स**ने "**गोवत्स**" नावाने ओळखल्या जाणाऱ्या वासरांच्या नाविन्यपुर्व पशुखाद्यांच्या मालिकेची निर्मिती केली आहे, ती आपण पुढे पाहु.

## 'गोवत्स-स्टार्टर'
### मातेच्या दुधासारखे पौष्टीक



**'गोवत्स स्टार्टर' काय आहे ?**

ज्या संगोपन व्यवस्थापनामध्ये गोपालक वासराला गाई-म्हैशींचे दुध वासराच्या शरीरपोषण गरजेपेक्षा कमी मात्रेत देतो त्यावेळी वयाच्या चौथ्या आठवड्यानंतर शरीराची वाढ गतीमान होत असल्याने वासराला दुधातून मिळणारी पोषणमुल्ये कमी पडतात. याचवेळी वासराच्या शरीराची वाढ फार झपाटयाने होत असते व त्यांची भुक ही वाढत असते. खरे पाहिले तर वासरांच्या वाढीस योग्य ती पोषणमुल्ये मिळवण्याच्या दृष्टीने दुधाला पर्याय नाही. परंतू दुधापासूनचे आपले उत्पादन अधिक राहण्याच्या दृष्टीने गोपालक वासराला दिल्या जाणाऱ्या दुधाची मात्रा कमी कमी करत राहतो.

या सर्व बाबी विचारात घेऊन वासरांच्या सुदृढ शरीर वाढीसाठी आवश्यक त्या पोषणमुल्यांचा योग्य त्या प्रमाणात त्यांना पुरवठा होण्याच्या दृष्टीने '**हिन्दुस्तान फीड्स**' ने बाजारात '**गोवत्स स्टार्टर**' हे पशुखाद्य आणले आहे. हे पशुखाद्य तज्ञांच्या निरीक्षणाखाली आधूनिक कारखान्यात, सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तम दर्जाचे पेंडी, कोंडा, मका, सोयाबीन व सरकी इ. सारखे पौष्टीक अन्नघटक मिसळून तयार केले जाते. या खाद्याची उर्जा वाढवून त्याचा रूचकरपणा वाढावा म्हणून मळी व मीठ हे मिसळले जाते.

हाडांची व इतर शरिराची वाढ जोमाने होण्याच्या दृष्टीने कॅल्शीअम, फॉस्फरस सहित १४ सुक्ष्म व अतिसुक्ष्म क्षार धातूंचा गोवत्समध्ये समावेश केलेला आहे. त्यामुळे '**गोवत्स स्टार्टर**' हे सात्विक, रूचकर, चवदार व पौष्टीक गुणधर्मयुक्त बनते. त्यामध्ये २० टक्क्यापेक्षा जास्त प्रथिने व ७५ टक्क्यापेक्षा जास्त एकूण पचनीय पोषणसत्त्वे असतात. त्यामुळे वासरे निरोगी राहून त्यांची झपाट्याने वाढ होते व कालवडी वयाच्या दीड वर्षाला २२५ ते २५० किलो दरम्यान वजनाच्या होऊन त्यांची माजावर येण्याची संभावना वाढते. या संवेदनशील कालावधीमध्ये कॉक्सीडीओसिस सारख्या परजीवींचा प्रतिबंध करून पचनक्रिया सुरळीत चालू ठेवते. एकंदरीत आरोग्य सुदृढ ठेवण्याच्या दृष्टीने रूमेन्सीन सारख्या पुरकाचा ही '**गोवत्स स्टार्टर**' पशुखाद्यात वापर केला आहे.

**वासरांच्या वयानुसार 'गोवत्स स्टार्टर' पशुखाद्य देण्याचे प्रमाण (ग्रॅम मध्ये)**

| महिना | १ ला आठवडा | २ रा आठवडा | ३ रा आठवडा | ४ था आठवडा |
|---|---|---|---|---|
| १ ला | - | - | - | २०० |
| २ रा | २०० | २०० | ३०० | ४५० |
| ३ रा | ५०० | ६०० | ७०० | ८०० |
| ४ था | ९०० | १००० | ११२५ | १२५० |
| ५ वा | १३७५ | १५०० | १५०० | १५०० |
| ६ वा | १७५० | १७५० | १७५० | १७५० |
| ७ वा | २००० | २००० | २००० | २००० |

**'गोवत्स स्टार्टर' खाद्य वापरण्याची पद्धत : -**

'**गोवत्स स्टार्टर**' हे खाद्य वयाच्या चार आठवड्यानंतर वासरांना वरील मात्रेप्रमाणे द्यावे. नवीन खाद्य द्यावयास सुरू करताना प्रथम काही दिवस कमी प्रमाणात खाद्य देऊन, हळूहळू सवय लागेल तसे खाद्य प्रमाण वाढवित जावे.

## 'गोवत्स-ग्रोवर'
### वासरांच्या जलद व सुदृढ वाढीसाठीचा सर्वोत्कृष्ट पशुआहार



सात महिन्यानंतर ही वासरे किंवा पारड्यांचे कोटीपोट पूर्णपणे कार्यक्षम होऊन शरीराच्या वजनाच्या प्रमाणात वाढत असते. चारा पचवण्याची क्षमता बऱ्यापैकी सुधारलेली आढळते. पण त्यांच्या चारा ग्रहण क्षमतेला मर्यादा असते म्हणून उपलब्ध चारा हा उच्च दर्जाचा अपेक्षित आहे. चारा पचवण्याची नैसर्गिक देणगी या रवंथ करणाऱ्या जनावरांवर मिळालेली आहे. पण ज्या प्रमाणात दैनिक वजन सात महिन्यापर्यंत वाढलेले असते. त्याचा वेग बऱ्यापैकी स्थिर झालेला असतो. ज्या वासरांना किंवा पारड्यांना '**गोवत्स स्टार्टर**' उशीरा म्हणजे दोन किंवा तीन महिन्यापासून देण्यास सुरूवात केली आहे. अशा जनावरांना सात महिन्याऐवजी आठ महिन्यापर्यंत '**गोवत्स स्टार्टर**' खाद्य देणे अपेक्षित आहे. खालेल्या चाऱ्याच्या प्रमाणात या घन आहाराचा म्हणजेच '**गोवत्स ग्रोवर**' चा ५०-६० टक्के एवढा एकूण खाद्य ग्रहण क्षमतेमध्ये वाटा असणे अपेक्षित आहे. जर कालवडी पहिल्यांदा माजावर आल्या असल्या तरी शरीर वाढीचा दर कमी होतो म्हणून जास्त शारिरीक वाढ घडवून आणणे गरजेचे असते. '**गोवत्स ग्रोवर**' बनविताना सात महिन्यांपुढील वाढणाऱ्या कालवडी किंवा पारड्यांसाठी त्यांच्या शरीराची गरज पूर्ण होऊन वाढणाऱ्या वजनाची गती स्थिर राखण्यास मदत होईल त्याची खबरदारी घेतली आहे. त्याच प्रमाणे वजन वाढीसाठी आणि शरीराच्या सर्वांगीण विकासासाठी लागणारे अमिनो आल्मे, प्रथिने, क्षार व तेलयुक्त पदार्थ याचा योग्य समतोल राखला आहे.

या काळात कोटीपोटाची कार्यपद्धती योग्य रित्या चालू झालेली असते परंतु दिलेल्या चाऱ्याच्या ग्रहण क्षमतेनुसार वाढणाऱ्या जनावरांच्या कोटी पोटामध्ये उपयुक्त पोषके किण्वन (Fermantation) प्रक्रियेने तयार होणे गरजेचे असते. त्यामुळे दूध उत्पादनासाठी वापरली जाणारी इतर खाद्ये जास्त मात्रेमध्ये वापरल्यास शरीरास गरजेपेक्षा जास्त पोषके पुरवली जाण्याची जास्त शक्यता असते त्यामुळे जनावरांची गरजेपेक्षा जास्त वाढ होऊ शकते. जर उत्पादने कमी प्रमाणात दिल्यास कोटी पोटामध्ये किण्वन प्रक्रियेपासून तयार होणाऱ्या पोषकांच्या प्रक्रियेची गती मंदावते आणि अपेक्षित परिणाम मिळाल्यास बाधा निर्माण होईल. वरील सर्व गोष्टींचा सारासार विचार करून तज्ञ पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत आधुनिक अशा कारखान्यात हिंदुस्तान फीड्स ने '**गोवत्स ग्रोवर**' या वासरांच्या/कालवडींच्या वयाला पूरक असे दर्जेदार पशुखाद्य आपणासाठी उपलब्ध केले आहे.

**'गोवत्स ग्रोवर' खाद्य वापरण्यासंबंधी सुचना :**

'**गोवत्स ग्रोवर**' हे खाद्य वयाच्या सात महिन्यापासून बारा महिन्यापर्यंत वासराला देण्याचे प्रमाण (किलो मध्ये) २ किलो प्रति दिवस प्रति जनावर



## 'गोवत्स-हीफर'
### प्रजनन चक्र, शरीर संगोपन व भरपुर दुग्धोत्पादनाच्या तयारीसाठीचा समतोल पशुआहार



हीफर म्हणजे वयाच्या एक वर्षांपासून ते विण्याच्या काळापर्यंतच्या कालवडींना किंवा रेडींना हीफर संबोधले जाते. वासराची एका वर्षापर्यंत बऱ्यापैकी शारीरिक वाढ झालेली असते आणि येथून पुढे कोटी पोटाच्या जास्तीत जास्त उपयोग करून जास्तीत जास्त चारा पचवून उर्वरित आयुष्य व्यतीत करणार असतात.

**हीफरच्या या वयात तिला मुख्यत: ३ गोष्टींना सामोरे जावे लागते :**

**१) प्रजनन चक्र :** या वयामध्ये बऱ्यापैकी प्रजनन चक्र रूजु होण्याच्या मार्गावर असते. कालवडी किंवा म्हैशीच्या रेड्या सुप्त माजावरती येत असतात, बऱ्याचदा रक्त व घाण योनी मार्गे स्त्रवल्याने शेतकऱ्यांच्या निदर्शनास आलेले असते.

एकदा हे प्रजनन चक्र सुरू झाले की वाढीचा दर कमी होतो. मग बऱ्याचदा शेतकऱ्यांना पशुवैद्यक अजून वजन वाढले पाहिजे असा सल्ला देतात. कमी वजन असताना जर या कालवडी गाभण राहिल्या तर भविष्यात त्यांचे दूध उत्पादन घटते कारण पुरवली गेलेली पोषके दूध उत्पादनाऐवजी शरीर वाढीसाठी वापरली जातात आणि जन्मलेले वासरू सशक्त असल्याची शक्यता कमी असते. या वयात इतर खाद्य अयोग्य मात्रेत दिल्यास जनावरे अती जाड झाल्याचे निदर्शनास आले आहे. अती जाड जनावरांना उत्पादन व प्रजनन निगडीत आजार होण्याची शक्यता असते. म्हणून प्रजनन चक्र सुरू झाले तरी शरीर वाढीसाठी गरजेची पोषके मुबलक प्रमाणात पुरवणे गरजेचे आहे. म्हणून दर्जेदार कालवडी निर्मितीसाठी महाराष्ट्रामध्ये पशुखाद्य निर्मितीमध्ये अग्रेसर असणाऱ्या हिंदुस्तान फीड्सने '**गोवत्स हीफर**' हे खाद्य शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे.